# *वार्तापत्र*

पोलीस अधिक्षक कार्यालय
गडचिरोली दि. २५/०८/२०१७

## *जिल्हा वर्धापन दिनानिमित्त जिल्हा पोलीस दलातर्फे पारंपारिक समुह नृत्य स्पर्धा व भव्य क्रीडा स्पर्धेचे आयोजन*

- *यावर्षीपासून गडचिरोली पोलीस दलाचा अनोखा उपक्रम*

गडचिरोली जिल्हा हा आदिवासी बहुल जिल्हा असून आदिवासींची स्वतंत्र अशी संस्कृती येथे नांदत आहे. त्या संस्कृतीला उभारी देण्यासाठी व आदिवासींच्या अंगीकृत असलेल्या विविध कलागुणांना वाव व संधी प्राप्त करुन देण्यासाठी गडचिरोली पोलीस विभागामार्फत संपूर्ण गडचिरोली जिल्हयामध्ये २६ ऑगस्ट जिल्हा वर्धापन दिनानिमित्त विविध पारंपारिक समुह नृत्य (रेला) स्पर्धा व भव्य क्रीडा स्पर्धा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

जिल्हयात खूप मोठया प्रमाणात आदिवासी नृत्याची परंपरा आहे. यामुळे जिल्हयात ठिकठिकाणी वेगवेगळया प्रकारचे नृत्याचे आविष्कार होतात, परंतु त्यांना चांगल्या प्रकारचे व्यासपीठ मिळत नाही. म्हणूनच आदिवासी नृत्याला चांगले व्यासपीठ मिळावे व आदिवासींचा पारंपारिक नृत्य प्रकार समृध्द व्हावा याकरीता गडचिरोली पोलीस दलातर्फे दरवर्षी हा उपक्रम राबविला जाणार आहे. दरवर्षी जिल्हा वर्धापन दिनाच्या निमित्ताने ही स्पर्धा घेतली जाणार आहे. पोस्टे/उपपोस्टे व पोमके स्तर, उपविभागीय स्तर व जिल्हा स्तर अशा तीन पातळीवर ही स्पर्धा घेण्यात येणार आहे. प्रत्येक स्तरावर प्रत्येकी तीन विजेत्यांना आकर्षक रोख पारितोषिक देण्यात येणार आहे. यामध्ये पोस्ट स्तरावर प्रथम बक्षिस रु. ३,०००/-, व्दितीय बक्षिस रु. २,०००/- व तृतीय बक्षिस रु. १,०००/-, उपविभागीय स्तरावर प्रथम बक्षिस रु. ७,०००/-, व्दितीय बक्षिस रु. ५,०००/- व तृतीय बक्षिस रु. ३,०००/-, व अंतिम जिल्हा स्तरावर प्रथम बक्षिस रु. २५,०००/-, व्दितीय बक्षिस रु. २०,०००/- व तृतीय बक्षिस रु. १५,०००/- असे भव्य पारितोषिक विजेत्यांना दिले जाईल.

याचबरोबर गडचिरोलीतील अतिदुर्गम भागातील आदिवासी युवकांच्या अंगी असलेल्या विविध कलागुणांना वाव देण्यासाठी गडचिरोली पोलीस दलामार्फत पुढील महिण्यामध्ये तीन स्तरावर व्हॉलीबॉल व कबड्डी स्पर्धेचे आयोजन देखील करण्यात आलेले आहे. या स्पर्धेमध्ये देखील नृत्य स्पर्धेप्रमाणेच आकर्षक रोख बक्षिसे राहतील.

जिल्हयातील युवक-युवतींनी या स्पर्धांमध्ये जास्तीत-जास्त सहभाग घेवून आपल्या विविध कलागुणांना वाव दयावा असे आवाहन पोलीस विभागामार्फत करण्यात येत आहे. तसेच या स्पर्धांच्या अधिक माहितीसाठी आपल्या नजीकच्या पोलीस स्टेशनमधील प्रभारी अधिकारी यांचेशी संपर्क साधावा.









